स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प.),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./मा.तं./87/24-25**
**दिनांक : 16/08/2024**

प्रेसनोट

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करत असताना महानगरपालिकामार्फत नाविन्यपूर्वक उपक्रम हाती घेण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार सार्वजनिक गणेशोत्सव साठी परवानगीबाबत एक खिडकी (Single Window) कक्ष राबविण्यात येत आहे. जेणेकरून गणेशोत्सव मंडळांना सर्व विभागाच्या परवानगीसाठी वेगवेगळया कार्यालयात जाऊन स्वतंत्र अर्ज करण्याऐवजी महापालिकेमार्फत तयार करण्यात आलेल्या एक खिडकी (Single Window) कक्षामध्ये अर्ज करता येईल, जेणेकरून गणेशोत्सव मंडळांना कमीतकमी वेळेत सर्व परवानग्या एका छताखाली मिळतील.

तसेच महानगरपालिका मार्फत सदर परवानगीसाठी मागील वर्षापासून Online सूविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मागील दोन वर्षा पासून ही सुविधा सुरु असून मागील वर्षी एकूण ७४५ गणेशोत्सव मंडळांना ऑनलाईन प्रक्रियेद्वारे परवानगी देण्यात आली होती. सर्व गणेशोत्सव मंडळ यांनी https://vvcmcpandalpermission.com/ या Link द्वारे अथवा QR code द्वारे Login केल्यानंतर सदर पोर्टलवर (Portal) गणेशोत्सव मंडळांच्या अर्जाची नोंदणी केली जाईल. तद्नंतर सदर अर्जाची महानगरपालिकेमार्फत प्राथमिक तपासणी करून संबंधित इतर विभाग जसे पोलीस विभाग, वाहतुक नियंत्रण शाखा, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व अग्निशमन विभाग यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पोर्टलद्वारे पाठविला जाईल. संबंधित विभागाकडून या बाबत आवश्यक ती तपासणी / शहानिशा करुन त्यांच्याकडील परवानगी / ना हरकत प्रमाणपत्र पोर्टलवर सादर केले जाईल. सर्व विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत संबंधित अर्जदार/गणेशोत्सव मंडळ यांना Online portal द्वारे परवानगी दिली जाईल. याकरीता कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.

सदरची संपूर्ण प्रक्रियाही Online स्वरूपाची आल्यामुळे गणेशोत्सव मंडळांना कोणत्याही विभागाकडे वारंवार हेलपाटे मारण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे त्यांचे श्रम व वेळ दोन्हींची बचत होणार आहे. सदर परवानगी प्रक्रियेसाठी संबंधित एक खिडकी (Single Window) कक्षामध्ये गणेशोत्सव मंडळांना सदरचा अर्ज भरताना मार्गदर्शन / मदत करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत कार्यालयीन अधिक्षक व संगणक ऑपरेटर कार्यालयीन वेळेत उपस्थित असतील.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक प्रभाग समिती स्थरावर सदरची एक खिडकी (Single Window) कक्ष तयार करण्यात आलेले आहेत. तरी सर्व गणेशोत्सव मंडळांनी सदर सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(समीर भुमकर)
उपायुक्त
माहिती तंत्रज्ञान विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका